सुधारित .....



राज्यशासनाच्या शिष्यवृत्या
दरात सुधारणा.

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. एससीएच २००३/(४०५/०३)/मशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ५फेब्रुवारी,२००४

पहा :- १) शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग क्र. एससीएच १०६५-यु, २९ सप्टेंबर, १९६५.
२) शासन निर्णय, शिक्षण, क्रीडा व समाजकल्याण विभाग क्र. एससीएच १४७०/ १०७५७२/ एस, दिनांक १४ मे, १९७१.
३) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एससीएच १०८२/ ४१९९/ विशि-३, दि. १३ ऑगस्ट,१९८५.
४) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एससीएच १०८५/ ५०६२००/ (२६५१) दि. २१ ऑक्टोबर,१९८५.
५) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. विपस-१०९३/ ६५५२७(८०)/ मशि-४, दि. १ जुलै,१९९४.
६) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं / शिष्य/ योजना / बदल /१४-अई , दिनांक २४ जुलै,२००३.
७) विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. एफ.१९-१/२००२(SA-I/ Policy), दिनांक ५-२-२००३.
८) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं / शासंअछा/येलेरे / बदल /१४-अई /१४१९, दिनांक २७ जानेवारी,२००४.

## शासन निर्णय

उच्च शिक्षणाच्या अंतर्गत असणा-या विविध शिष्यवृत्त्यांच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता या निर्णयाद्वारे राज्य शासनाच्या खालील शिष्यवृत्त्यांच्या दरात त्यासमोर दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यास मंजूरी देत आहे :-

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे नाव | संच | सध्याचे दर | सुधारित दर २००३-०४ पासून |
|---|---|---|---|---|
| १. | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती | १४ | रू. ४००/-दरमहा + रू. ५०/- दरमहा सादिलवार खर्च | रू. ७५०/- दरमहा +रू.१०००/- वार्षिक सादिलवार खर्च |
| २. | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | १२०८ | रू.३५/-दरमहा | रू.१००/-दरमहा |
| ३. | राज्यशासनाची दक्षिणाअधिछात्रवृत्ती | ७६ | रू. ६०/- दरमहा | रू. २५०/- दरमहा |
| ४. | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती. | १०० | रू.४०/-दरमहा | रू.१००/-दरमहा |
| ५. | जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली.. शिष्यवृत्ती | १ | रू. ५०००/-दरमहा + रू. ५०००/- वार्षिक सादिलवार | रू. ८०००/-दरमहा + रू. १००००/- वार्षिक सादिलवार |

२. यावरोबरच एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेसाठी असलेली उत्पन्नाची मर्यादा रू.३५,०००/- ऐवजी रू. ७५,०००/- करण्यास व गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्याकरिता वरिष्ठ महाविद्यालयांच्या बाबतीत नुतनीकरणासाठी किमान ६५% गुण व कनिष्ठ महाविद्यालयांच्या बाबतीत नुतनीकरणासाठी किमान ५५% गुण आवश्यक करण्यास [illegible] शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

३. यावर होणारा खर्च " २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०३, विद्यापीठीय व उच्च शिक्षण"या प्रधान शीर्षाखाली व संबंधीत उपशीर्षांखाली मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय २००३-०४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाबाबत प्रधान सचिव,वित्त यांच्याकडे दिनांक १६.१.२००३ रोजी झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु. द. पडवळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व सह संचालक, उच्च शिक्षण, प्रादेशिक विभाग.
महालेखापाल (लेखा परीक्षा )-१/२, महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर .
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई .
कोषाधिकारी, पुणे.
नियोजन विभाग / वित्त विभाग.
उच्च व तंत्रशिक्षण विभाग ,कार्यासन-(साशि-१).
निवड नस्ती (साशि-१).